आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२२ ऑक्टोबर २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

नौदलाच्या प्रमुख अधिकाऱ्यांची द्वैवार्षिक परिषद आजपासून नवी दिल्लीत सुरु

वन संरक्षणासाठीच्या जागतिक क्रमवारीत भारताची नवव्या स्थानावर झेप

लडाखमधल्या नेत्यांशी आज केंद्रीय गृहमंत्रालयाच्या उच्चाधिकार समितीची चर्चा

बिहार निवडणुकीच्या प्रचाराला जोर

फरार व्यापारी मेहुल चोकसीच्या प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा

**आणि**

पॅरिसच्या लूव्र संग्रहालयातून अंदाजे ८८ दशलक्ष युरो किमतीच्या दागिन्यांची  चोरी

**<><><><><>**

भारतीय नौदलाच्या प्रमुख अधिकाऱ्यांची द्वैवार्षिक परिषद आजपासून नवी दिल्लीत सुरु झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग उद्या परिषदेला संबोधित करतील. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर नौदलाच्या युद्धसज्जतेबाबत या परिषदेत विचारविनिमय होईल. नौदलप्रमुख आणि इतर वरिष्ठ अधिकारी या परिषदेत हिंदी महासागरातल्या सुरक्षास्थितीचा आढावा घेतील.

लष्कर, हवाई दल आणि तटरक्षक दलाबरोबर समन्वयाने हिंदी महासागर आणि प्रशांत महासागर क्षेत्रातल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी तयारी करणं हे नौदलाचं प्रमुख उद्दिष्ट आहे. ही परिषद ३ दिवस चालणार आहे.

**<><><><><>**

भारताने वन संरक्षणासाठीच्या जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानावर झेप घेतली आहे. इंडोनेशियात बाली इथं अन्न आणि कृषी संघटनेने ही जागतिक वन संसाधन मूल्यांकन २०२५ क्रमवारी जाहीर केली. सर्वाधिक जास्त वनक्षेत्र विकसित करणाऱ्या देशांना या क्रमवारीत स्थान मिळतं. गेल्या वर्षी या क्रमवारीत भारताला दहावा क्रमांक मिळाला होता. यंदा त्यात सुधारणा झाल्याची माहिती केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव

यांनी दिली आहे. वन संरक्षण, वनीकरण आणि पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने सरकारने सुरू केलेल्या विविध उपक्रमांचं हे यश असल्याचं यादव म्हणाले.

<><><><><>

देशाची नवीकरणीय ऊर्जा क्षमता २०१४ मध्ये ३५ गिगावॅट्स होती, ती आता पाचपटींनी वाढून १९७ गिगावॅट्सवर पोहोचली आहे. यात मोठ्या जलऊर्जा प्रकल्पांमधून निर्माण झालेल्या ऊर्जेचा समावेश नाही. २०३० पर्यंत बिगरजीवाश्म ऊर्जा क्षमता ५०० गिगावॅट्सपर्यंत नेण्याचं उद्दिष्ट असल्याचं नूतन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

भारतातील किरकोळ विक्री क्षेत्रानं यावर्षी नवरात्र ते दिवाळी दरम्यान सणासुदीच्या हंगामातील सर्वाधिक विक्री नोंदवली. यामध्ये अभूतपूर्व ५ लाख ४० हजार कोटी रुपयांच्या वस्तू आणि ६५ हजार कोटी रुपयांच्या सेवांची उलाढाल झाली. अखिल भारतीय व्यापारी महासंघानं केलेल्या देशव्यापी सर्वेक्षणात, याच कालावधीत एकंदर उलाढाल गेल्या वर्षीच्या तुलनेत २५ टक्क्यांनी वाढल्याचं दिसून आलं आहे. प्रामुख्यानं GST दरांमध्ये घट झाल्यामुळं ही वाढ झाली आहे. मिठाई, गृहसजावट, पादत्राणं, तयार कपडे, ग्राहकोपयोगी आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या किंमती सर्वसामान्य लोकांच्या आवाक्यात आल्या आहेत आणि खरेदीचा वेग वाढला आहे.

<><><><><>

केंद्रीय गृह मंत्रालयाची उच्चाधिकार समिती आज नवी दिल्लीत विविध मुद्द्यांवर लडाखच्या नेत्यांशी चर्चा करत आहे. गेल्या महिन्यात लडाखमधे झालेल्या हिंसाचारानंतर महत्त्वाच्या मुद्द्यांवर पहिल्यांदाच औपचारिक चर्चा होत आहे. याचर्चेत लडाखचं शिष्टमंडळ राज्याचा दर्जा आणि सहाव्या सूचीत समावेश यासारख्या मागण्या मांडण्याची शक्यता असल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे. या चर्चेत कारगिल लोकशाही आघाडी, लेहमधल्या आंदोलनकर्त्यांच्या शिखर संस्थेचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

<><><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी येत्या ६ नोव्हेंबरला मतदान होणार असून, निवडणूक प्रचारानं जोर धरला आहे. सत्ताधारी आणि विरोधी दोन्ही पक्षांकडून मतदारांना आकर्षित करण्यासाठी अनेक आश्वासनं दिली जात आहेत.

महाआघाडी सत्तेत आली तर स्वयंसहायता गटांशी संबंधित जीविका दीदी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सरकारी नोकरी देण्याचं आश्वासन राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी प्रसाद यादव यांनी दिलं आहे. स्वयंसहायता गटांशी जोडलेल्या प्रत्येक जीविका दीदीला आरोग्य विमा आणि इतर लाभांसह दरमहा ३० हजार रुपये वेतन देण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं आहे.

दुसरीकडे राष्ट्रीय लोकशाही आघाडी पुन्हा सत्तेत आली, तर राज्याच्या विकासाच्या गतीला आणखी वेग दिला जाईल असं आश्वासन भाजपाचे नेते देत आहेत.

दरम्यान, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि पक्षाचे निवडणूक निरीक्षक अशोक गेहलोत आज प्रचाराच्या धोरणासंदर्भात महाआघाडीच्या नेत्यांसोबत चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

दीपावलीच्या प्रकाश पर्वातला बलिप्रतिपदेचा सण आज सर्वत्र साजरा होत आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या सणाच्या दिवशी नवीन खरेदी किंवा उपक्रमांचा प्रारंभ केला जातो. बलिप्रतिपदेनिमित्त शेअर बाजार आज बंद आहेत. उत्तर भारतात या दिवशी गोवर्धन पूजन केलं जातं. उत्तराखंडमधल्या चारधामपैकी गंगोत्रीची कवाडं हिवाळ्यासाठी बंद करण्याचे विधी आजपासून सुरु झाले. लक्ष्मी आणि कुबेर पूजनाचा सण काल सर्वत्र उत्साहानं साजरा झाला. घरोघरी तसंच व्यावसायिक आस्थापनांमध्ये पारंपरिक पद्धतीनं लक्ष्मीपूजन झालं. लक्षवेधक रांगोळ्या, आकर्षक रोषणाई आणि आसमंत उजळून टाकणारी आतषबाजी, असं चैतन्यमयी वातावरण काल सर्वत्र होतं.

महाराष्ट्राच्या अनेक भागात पावसाच्या जोरदार सरींनी काल हजेरी लावली. त्यामुळे दिवाळीच्या उत्साहावर अनेक ठिकाणी पाणी पडलं.

**<><><><><>**

फरार व्यापारी मेहुल चोकसीच्या भारतात प्रत्यार्पणाविरोधातली याचिका अँटवर्प इथल्या न्यायालयानं आज फेटाळली. या निर्णयामुळे त्याला भारतात आणण्याच्या प्रक्रियेतला मोठा अडथळा दूर झाला आहे. १३ हजार कोटी रुपयांच्या पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणी तो मुख्य आरोपी आहे.

<><><><><>

पॅरिसच्या लूव्र संग्रहालयातून अंदाजे ८८ दशलक्ष युरो अर्थात १०२ दशलक्ष डॉलर्स किमतीचे राजघराण्याचे दागिने चोरीला गेले आहेत. फ्रान्सच्या सरकारी वकील लॉरे बेक्को यांनी ही माहिती दिली. या दागिन्यांचं ऐतिहासिक मूल्य बाजारमूल्यापेक्षाही जास्त असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

काल सकाळी चार संशयितांनी गॅलरी दी अपोलॉन इथून क्रेनच्या सहाय्यानं ही चोरी केल्याचं सांगितलं. राणी मेरी-लुईस आणि महाराणी युजीन यांच्याशी सबंधित फ्रेंच राजघराण्याच्या आठ दुर्मीळ वस्तू चोरीला गेल्या असल्याचं त्यांनी सांगितलं. या चोरीचा १०० पेक्षा जास्त जण तपास करत आहेत, आणि  हे दागिने नष्ट करू नयेत असं आवाहन चोरांना केल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

उत्तर कोरियानं आज एकाच वेळी अनेक आखूड पल्ल्याची मारक क्षेपणास्त्र डागली. येत्या काहीच दिवसात दक्षिण कोरियात आशिया - प्रशांत क्षेत्र आर्थिक सहकार्य परिषद होणार आहे. त्यानमित्तानं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प तसंच चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग हे दक्षिण कोरियाला भेट देण्याची शक्यता असल्यानं,  उत्तर कोरियाच्या या कृतीनं चिंता वाढल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

ही क्षेपणास्त्र उत्तर व्हांगाये प्रांतातल्या जुंगव्हा इथून डागली गेली, आणि त्यांनी सुमारे ३५० किलोमीटरचा पल्ला गाठला अशी माहिती दक्षिण कोरियाच्या अधिकाऱ्यांनी दिली. उत्तर कोरियाच्या या कृतीच्या पार्श्वभूमीवर दक्षिण कोरियानं देखरेख आणि गस्तीचं प्रमाण वाढवलं आहे.

<><><><><>

हमासने निःशस्त्रीकरण करायला नकार दिला तर त्याचे गंभीर परिणाम होतील, मात्र, सहकार्य केलं तर हमासच्या सदस्यांचा जीव वाचू शकतो, असा इशारा अमेरिकेचे उपाध्यक्ष जे डी व्हान्स यांनी दिला आहे. गाझामध्ये परकीय सैन्याबाबतचा कोणताही निर्णय इस्त्रायलने घ्यावा असंही ते म्हणाले आहेत. इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांच्या भेटीसाठी व्हान्स काल इस्त्रायलमध्ये दाखल झाले आहेत.

<><><><>

युक्रेनमधल्या उर्जा केंद्रांवर रशियाने केलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यात दोन जण मरण पावले आहेत. या हल्ल्यात कीव इथल्या लष्करी औद्योगिक संकुलाचा भाग असलेल्या एका रासायनिक उद्योगाचं नुकसान झालं आहे. या हल्ल्यांमुळे अमेरिकेने ट्रंप आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यातली नियोजित शिखर परिषद पुढे ढकलली आहे.

<><><><>

ऑलिंपिक स्पर्धेत दोन वेळा पदक जिंकणारा भालाफेकपटू नीरज चोप्रा याला भारतीय सैन्यात लेफ्टनंट कर्नल म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांच्या उपस्थितीत आज नवी दिल्ली इथे हा समारंभ झाला. त्यांनी नीरज चोप्रा याच्या लष्करी गणवेशावर नवीन पदाचं चिन्ह लावून त्याला अधिकृतपणे बढती दिली. ऑगस्ट २०१६मध्ये चोप्रा याला भारतीय सैन्यात नायब सुभेदार पदावर ज्युनियर कमिशन्ड ऑफिसर म्हणून रुजू करण्यात आलं होतं. त्याला मिळालेल्या अर्जुन पुरस्कार आणि खेलरत्न पुरस्कारानंतर २०२१मध्ये सुभेदार पदावरही बढती मिळाली होती. २०२२मध्ये भारतीय सैन्यातर्फे देण्यात येणारं परम विशिष्ट सेवा पदक देण्यात आलं तसंच सुभेदार मेजर पदावरही बढती देण्यात आली होती.

<><><><>

आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेत कोलंबो इथं काल झालेल्या राउंड रॉबिन लीग फेरीतल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं पाकिस्तानचा १५० धावांनी पराभव केला. पावसामुळं सुरुवातीला झालेल्या विलंबानंतर, सामना ४० षटकांपर्यंत कमी करण्यात आला आणि दक्षिण आफ्रिकेनं ९ बाद ३१२ धावा केल्या. या विजयासह, दक्षिण आफ्रिकेनं

गुणतालिकेत अव्वल स्थान मिळवलं तर पाकिस्तान संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे. दक्षिण आफ्रिकेचे आता सहा सामन्यांत १० गुण आहेत. ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडचे प्रत्येकी ९ गुण असून आज त्यांचा सामना इंदूरमध्ये होणार आहे.

<><><><><>

बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची शक्यता असून त्यामुळे तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि उत्तर आंध्र प्रदेशात मुसळधार पाऊस पडेल, असा इशारा भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. मुसळधार पावसामुळे तामिळनाडूमध्ये चेन्नई, चेंगलपट्टू आणि कांचीपुरममधल्या शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

//<><><><><>//